जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 AUG 2019
तरुण भारत

# विद्यापीठाचा पूरग्रस्तांना आधार




**शहरातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा**

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाची जलमय विद्यापीठ म्हणून महाराष्ट्रभर ओळख आहे. पाण्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण असलेल्या विद्यापीठाने अस्मानी संकटात शहरातील नागरिकांसह पूरग्रस्तांना पिण्यासाठी पाणीपुरवठा केला. गेल्या तीन दिवसापासून पाण्यासाठी नागरिकांची गर्दी आहे. तसेच पूरग्रस्त लोकांच्या जनावरांसाठी दोन दिवसात पाच ट्रक ओला चारा पुरवला.

शिवाजी विद्यापीठाने सामाजिक भान ठेवत पूरग्रस्तांच्या राहण्याची सोय केली. पूरग्रस्तांना अन्न, पाणी, कपड्यांसह आवश्यक त्या सर्व सुविधा पुरवण्यात आल्या. महापुरामुळे शहरात गेल्या सहा दिवसापासून पाणीपुरवठा खंडीत झाला आहे. त्यामुळे शहरातील सर्वांसाठी फिल्टर पाणी खुले करून दिले आहे. आतापर्यंत हजारो लोकांसह पूरग्रस्तांच्या निवारा केंद्रावरही सामाजिक संघटना पाणी घेऊन जात आहेत. विद्यापीठाने दिलेल्या आधाराबद्दल लोकांमधून समाधान व्यक्त होत आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
पुढारी
12 AUG 2019



इंदोरमधील डोंबारी समाजातील कुटुंबाचे हाल

# खेळ मांडला देवा... तरी धीर नाही सोडला

कोल्हापूर : प्रवीण मस्के

रस्त्यावर कला सादर करून उदरनिर्वाह करणारे इंदोर (मध्य प्रदेश) येथील डोंबारी समाजातील शरीफ शहा यांचे कुटुंब शिवाजी विद्यापाठातील 'कमवा आणि शिका' योजनेच्या विद्यार्थी वसतिगृहात स्थलांतरित म्हणून राहत आहे. उदरनिर्वाहासाठीची कला सादर करता येत नसल्याने अडचणीत सापडले आहे. जवळ काही शिल्लक राहिले नसले तरी धीर न सोडता नव्या उमेदीने जगण्याचा निर्धार त्यांनी केला आहे.

गेल्या काही दिवसांपासून कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यात महापुरामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. इंदोर येथून डोंबारी समाजातील शरीफ यांचे कुटुंब प. महाराष्ट्रात भटकंती करीत जगण्यासाठी आले आहे. कोल्हापुरात आठवडाभरापूर्वी आले. रस्त्यावर कला सादर करताना कसरत करावी लागते. अशा कोल्हापुरातील पुरामुळे सर्व साहित्य वाहून गेले. वाहतूक व्यवस्था बंद असल्याने जायचे कुठे हा प्रश्न निर्माण झाल्याने पाच दिवस मध्यवर्ती बसस्थानकात काढावे लागले. शिवाजी विद्यापीठातील राष्ट्रीयसेवायोजनेच्यास्वयंसेवकांनी त्यांना विद्यापीठात आणले. जेवण, कपडे यासह वैद्यकीय सुविधा पुरविल्या. कोल्हापूरच्या लोकांबद्दल कृतज्ञता व्यक्त करीत सर्वांचे आभार मानले.

> इंदोरमधून महाराष्ट्रात रस्त्यावर कला सादर करून जगण्यासाठी फिरतो. आठवडाभरापूर्वी कोल्हापुरात आलो. पावसामुळे रस्ते बंद पडल्याने अडकून राहावे लागत आहे. जवळच्या सर्व वस्तू वाहून गेल्या आहेत. विद्यापीठाच्या 'एनएसएस'च्या विद्यार्थ्यांनी आमची कुटुंबातील सदस्यांप्रमाणे वागवले. त्यांचे ऋण विसरता अशक्य आहे.
>
> **जरीन शहा, इंदोर**